**एकात्मिक सिग्नलींग प्रणालीच्या चाचणी साठी मेट्रो मार्ग 2अ आणि 7 वर मेगाब्लॉक**

**मुंबई, जानेवारी 06, 2023:**

मेट्रो मार्ग 2अ आणि 7 पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी फेज 1 आणि 2 या दोन्ही मार्गिकांमध्ये एकात्मिक सिग्नलिंग प्रणाली कार्यान्वित करणं गरजेचं आहे. या प्रणालीची अंमलबजावणी आणि चाचणी करण्यासाठी सध्या कार्यान्वित असलेल्या पहिल्या टप्प्यांतील सेवा बंद करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दिनांक 08 जानेवारी 2023 रोजी सकाळी 06 वाजे. पासून रात्री 10 वाजेपर्यंत दोन्ही मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात मेट्रो मार्ग 2अ आणि 7 च्या डहाणूकरवाडी ते आरे दरम्यान पहिल्या टप्प्यात सुरू असलेली मेट्रो सेवा प्रवाशांसाठी उपलब्ध नसेल.

**मेगाब्लॉक दरम्यान कामाचे स्वरूप**

• पब्लिक अनाऊंसमेंट सिस्टीम, पॅसेंजर इन्फॉर्मेशन डिस्प्ले सिस्टीम, सिग्नलिंग आणि टेलिकॉम सिस्टीमसह रोलिंग स्टॉक यांसारख्या सिस्टीमची एकात्मिक चाचणी करणे.

• दुसऱ्या टप्प्यात चाचणी होत असलेल्या तसेच वापरण्यात येणाऱ्या अद्ययावत प्रणाली सोबत पहिल्या टप्पा संरेखित करणे.

• प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी संपूर्ण प्रणालीची अखंडता आणि सुरक्षितता तपासणे.

**"प्रकल्पाची संपूर्ण स्थापत्य तसेच प्रणालीची कामे पूर्ण झाली आहेत, लवकरच मेट्रो 2अ आणि 7 चा दुसरा टप्पा मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल, ही मार्गिका पादचारी पुलाद्वारे मेट्रो मार्ग 1 सोबत जोडली गेल्यामुळे रस्त्यावरील रहदारी कमी होईल"** अशी माहिती एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी दिली.

**Mega block for testing of integrated signaling system on Metro Line 2A &7**

**Mumbai, January 06, 2023**

MMRDA is integrating the signaling, system between both phases of Metro Line 2A and 7. This activity is important to avoid inconvenience to the passengers once the entire corridor is commissioned for operation. This activity requires the closure of existing operation corridors. For that there will be a mega block on 08-01-2023 and Metro services will not be available for general public between 06:00 to 22:00 hours on Phase-I of Metro Lines 2A and 7 (Dahanukarwadi to Aarey).

**Scope of work during Mega block.**

- Overall integrated testing of systems like public announcement system, Passenger information display system, and Rolling Stock with signaling, Telecom, and PSD systems.
- Upgrading phase 1 is in line with the updated system functionality implemented and tested in phase 2.
- Checking overall system integrity and safety for passenger commute.

**"The entire civil work, as well as system works of the project, have been completed, soon the second phase of the Metro 2A & 7 will be in service of Mumbaikars, once this line gets fully operational, the road traffic will be reduced as this line is now connected and integrated with Metro Line 1 by FOB."** Said, Shri. S.V.R. Srinivas IAS, Hon. Metropolitan Commissioner, MMRDA.